**शिक्षण विभाग (प्राथमिक ) जिल्हा परिषद, नांदेड**
*रेल्वे स्टेशन रोड,जिल्हा व सत्र न्यायालया समोर वजिराबाद,*
**नांदेड ४३१६०१.**

*वेबसाईट* **:- WWW.** *zpnanded.in* | *ई-मेल* **:-** ssananded1@gmail.com

जा.क्र./जिपनां/प्रा-१९ /२६६६/२०२५ | दिनांक **१७.०४.२०२५**

प्रति,
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती (सर्व),

विषय :- **सर्वसाधारण बदल्या सन २०२५ वास्तव्य सेवा जेष्ठता यादी प्राथमिक हरकती आक्षेपासाठी प्रसिध्द करणेबाबत**

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन जि.प.नांदेड यांचे पत्र क्रमांक--- दिनांक 01.04.2025
२.या कार्यालयाचे पत्र क्रं२४३८ दिनांक ०७.०४.२०२५.

उपरोक्त विषयानुषंगाने संदर्भाधिन पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की नांदेड जिल्हा परीषद शिक्षण विभाग प्रा अंतर्गत विस्तार अधिकारी शिक्षण, केंद्रप्रमुख अराजपत्रित मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, माध्यमिक शिक्षक-मराठी/उर्दू, शारीरीक शिक्षक, चित्रकला शिक्षक, प्रयोगशाळा सहायक, केंद्रप्रमुख इ. संवर्गाच्या ऑफलाईन पध्दतीने बदल्या करण्याबाबत वरील पत्रान्वये सामान्य प्रशासन विभागाने वेळापत्रक निश्चित करून दिले आहे. त्यानुसार सर्व तालुकानिहाय प्राप्त माहिती संकलीत करुन वास्तव्य सेवा जेष्ठता यादी जिल्हा स्तरावरून प्राथमिक स्वरूपात जिल्हा परिषदेच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरील यादीवर काही माहितीत त्रुटी /आक्षेप असल्यास सदरील आक्षेप पुराव्यासह अंतिम करुन सदरील अंतिम यादी दिनांक २७.०४.२०२५ पर्यंत (हॉर्ड व सॉफ्ट कॉपीसह ) व प्रमाणपत्रासह तालुक्यात काम करणारे कर्मचारी सोबत अंतिम यादी व विनंती बदली अर्ज यादी या कार्यालयास पाठविण्यात यावी विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**सोबत**: १) प्राथमिक वास्तव्य सेवाजेष्ठता यादी (बदली)
२) सर्वसाधारण बदल्या-२०२५ निश्चित केलेला वेळापत्रक
३) प्रमाणपत्र

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नांदेड करिता**

# सर्व साधारण बदली २०२५ वेळापत्रक

| अनु क्रं | कार्यसुची | दिनांक | |
|---|---|---|---|
| 1 | गट विकास अधिका-यांनी संवर्गनिहाय वास्तव्य सेवाजेष्ठता याद्या तयार करुन जिल्हा परिषदेस सादर करणे | 12 एप्रिल 2025 | 12 ए |
| 2 | जिल्हा परिषदेचे मु.का.अ. यांनी संवर्गनिहाय वास्तव्य सेवाजेष्ठता याद्या संबधित गट विकास अधिका-याकडून प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या एकत्रीत वास्तव्य सेवाजेष्ठता याद्या तयार करुन प्रसिध्द करणे | 17 एप्रील 2025 | |
| 3 | **प्राथमिक वास्तव्य सेवाजेष्ठता याद्या तयार करुन प्रसिध्द झाल्यानंतर आक्षेप व सूचना मागविणे व विनंती अर्ज घेणे.** | 18 ते 27 एप्रील 2025 | |
| 4 | आक्षेप व सूचनांचे निराकरण करुन अंतीम सेवाजेष्ठता याद्या व विनंती अर्ज याद्या प्रसिध्द करणे. | 2 मे 2025 | |
| 5 | प्रत्यक्ष बदली प्रक्रिया समुपदेशनाने पार पाडणे | 5 मे 15 मे 2025 | |

दिनांक:-

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, मी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,-------------- अंतर्गत सार्वत्रिक बदल्या -२०२५ मध्ये शिक्षक संवर्गाच्या बदल्याची वास्तव्य सेवा जेष्ठता ठरवत अससतांना सेवा जेष्ठता यादी शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रसिध्दी देण्यात येवुन त्यावर आक्षेप् व हरकती मागविण्यात आलेल्या आहेत. तसेच वास्तव्य जेष्ठता यादीचा पंचनामा केलेला आहे. सदर प्रकाशित केलेली माहिती अगदी बरोबर असुन ती कर्मचा-यांच्या मुळ सेवा पुस्तिकेतील पडताळणी करुन घेण्यात आलेली आहे. या बाबतीत काही आक्षेप आल्यास त्यास मी व्यक्तीशः जबाबदार राहिन. करिता प्रमाणपत्र देण्यात येते.

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती ---------